१४ एप्रिल विशेषांक...

# गौरव प्रकाशन

RNI NO. MAHMAR/210/35320 | संपादक : बंडूकुमार धवणे | Postal Reg. No. ATI/RNP/259/2022-2024

वर्ष १५ ◆ अंक २ ◆ अमरावती ◆ दि. २५ एप्रिल ते १ मे २०२४ ◆ पृष्ठ ४ ◆ किंमत २ ₹ ◆ Email: gauravprakashan1@gmail.com

## राहुल गांधींनी दिली विकासाची व देशवासीयांना लखपती करण्याची गॅरंटी

अमरावती (प्रतिनिधी) दि. २४: देशात महाविकास आघाडीचे सरकार येताच शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ होईल. देशातल्या ८० लाख महिला व बेरोजगार पदवीधर युवकांच्या खात्यात भारत सरकारतर्फे दरवर्षी एक लाख रुपये टाकून लाखो देशवासियांना लखपती करून दाखविण्याची गॅरंटी काँग्रेस नेते खा. राहुल गांधी यांनी परतवाडा येथील सभेत दिली. देशात पैशाची काहीच कमतरता नसल्याचे सांगत हे पैसे आपण देशवासीयांवर खर्च करून विविध क्रांतिकारी योजना लागू करणार करणार असल्याचे जाहीर वचनही राहल गांधी यांनी उपस्थितांना दिले. यावेळी त्यांनी लाखो देशवासियांना लखपती करण्यासाठी त्यांच्या खात्यात टकाटक टकाटक टकाटक पैसे वळते करणार असल्याचे सांगितले. आता देशवासीयांनी देशाचे संविधान व लोकशाही वाचविण्याच्या नव्या क्रांतीसाठी मतदान करण्याचे आवाहनही या सभेत राहुल गांधी यांनी केले.



अमरावती लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार बळवंत वानखडे यांच्या प्रचारार्थ बुधवारी (ता. २४) परतवाडा येथे विराट सभा आयोजित करण्यात आली होती या सभेत ते बोलत होते. राहुल गांधी यांचे सभामंडपात आगमन होताच त्यांचे मोठा पुष्पहार घालून जल्लोषात स्वागत करण्यात आले. दरम्यान राहुल गांधी व्यासपीठावर येताच उपस्थितांनी प्रचंड घोषणा दिल्या. राहुल गांधी तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है, वा रे पंजा, आला रे पंजा, राहुल गांधी जिंदाबाद, खावो मिठाई बाटो पेढे, घर घर बळवंत वानखडे अश्या घोषणांनी सभास्थळी नवचैतन्य निर्माण झाले होते. राहुल गांधी यांना ऐकण्यासाठी लाखोंचा जनसागर उलटला होता. या सभेला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी पालकमंत्री आ. यशोमती ठाकूर, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेता विजय वडेट्टीवार, खा. चंद्रकांत हंडोरे, उमेदवार बळवंत वानखडे, माजी खासदार अनंत गुढे, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, माजी आ. डॉ. सुनील देशमुख, काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव आशिष दुआ, प्रदेश उपाध्यक्ष नाना गावंडे, शिवसेना संपर्क प्रमुख सुधीर सूर्यवंशी, संपादक प्रकाश पोहरे, पदवीधर मतदार संघांचे आमदार धीरज लिंगाडे, काँग्रेस कमिटीचे जिल्हा अध्यक्ष बबलू देशमुख, काँग्रेस अल्पसंख्याक प्रदेश अध्यक्ष वसाहत मिर्झा, माजी आमदार मुझफर हुसेन, काँग्रेस प्रवक्ते दिलीप एडतकर, राष्ट्रवादी महिला अध्यक्ष संगीता ठाकरे, शिवसेना जिल्हा प्रमुख सुनील खराटे, अकोला लोकसभेचे काँग्रेसचे उमेदवार डॉ अभय पाटील, विरेंद्र जगताप, भैय्या पवार, हरिभाऊ मोहोड, शिवसेना नेत्या प्रीतीताई बंड, वासंतीताई मंगरोळे, मन्ना दारसिबे, अब्राहर काशिफ, दयाराम काळे, पराग गुडधे, प्रवीण खोब्रागडे, माजी आ. धाने पाटील, आदिवासी नेते राज चव्हाण, डॉ. रवी पटेल, सतीश पेंदाम यांच्यासह महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्रकाश पोहरे, आ. वजाहत मिर्झा, खा. चंद्रकांत हंडोरे, सुधीर सुर्यवंशी, बबलू देशमुख, दिलीप एडतकर आदीनीही मनोगत व्यक्त केले.

## अमिताभ बच्चन यांना लता दिनानाथ पुरस्कार प्रदान



मुंबई: ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांना 'लता दिनानाथ मंगेशकर' पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं आहे. मुंबईतल्या दिनानाथ मंगेशकर नाट्यगृहात बिग बींना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. बच्चन यांच्यासोबत मंचावर रणदीप हुड्डा यांचीही उपस्थिती होती.मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार अभिनेते पद्मविभूषण अमिताभ बच्चन यांना प्रदान करण्यात आलेला आहे. तसेच 'मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार' हा संगीत क्षेत्रातील प्रदीर्घ सेवेसाठी दिला जाणारा पुरस्कार संगीतकार ए. आर. रेहमान जाहीर झाला होता. हा पुरस्कार सोहळा २४ एप्रिल रोजी दीनानाथ मंगेशकर यांच्या स्मृतिदिनी सायंकाळी ६:३० वाजता दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह, विलेपार्ले येथे संपन्न झाला.उत्कृष्ट नाट्यनिर्मितीसाठी देण्यात येणारा पुरस्कार 'गालिब' या नाटकाला देण्यात आला. तसेच नाट्य- चित्रपटसृष्टीतील प्रदीर्घ सेवेसाठी अशोक सराफ यांना मा. दीनानाथ मंगेशकर पुरस्कार प्रदान करण्यात आला. रणदीप हुडा (उत्कृष्ट चित्रपट निर्मिती), अतुल परचुरे (प्रदीर्घ नाट्य सेवा), पद्मिनी कोल्हापुरे (प्रदीर्घ चित्रपट सेवा), रूपकुमार राठोड (प्रदीर्घ संगीत सेवा), भाऊ तोरसेकर (प्रदीर्घ पत्रकारिता) यांनादेखील दीनानाथ मंगेशकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सोबतच वाग्विलासिनी पुरस्कार मंजिरी फडके यांना त्यांच्या प्रदीर्घ साहित्यसेवेसाठी प्रदान करण्यात आला. दीपस्तंभ फाऊंडेशन मनोबल यांना समाजसेवेसाठी आनंदमयी पुरस्कार देण्यात आला.

## आंबेडकरी व मुस्लिम समाज माझ्या पाठीशी - आनंदराज आंबेडकर

अमरावती : आबं डेकरी व मसु लीम जनता माझ्या पाठिशी आहे. त्यामुळे काँग्रेसचा पराभव निश्चित आहे, आंबेडकरी जनतेला बाबासाहेबांच्या विचाराचा उमेदवार पाहिजे, दुसऱ्याच्या इशाऱ्यावर काम करणारा नाही, असे प्रतिपादन रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती अमरावती लोकसभेचे उमेदवार आंनदराज आंबेडकर यांनी केले. ते मराठी पत्रकार सघांत पत्रकारांना संबोधित करताना बोलत होते.मीडिया चौथा



आधारस्तंभ आहे. परंतु दिल्लीमधील मीडियाला गोदी मीडिया म्हटले जात.े तसचे अमरावतीचा मीडिया काँग्रेसचा मीडिया आहे. कारण आम्ही जिल्ह्यात सतत काम करीत असून माझ्याबाबत उलटसुलट बातम्या यते आहते . जिल्ह्यातील सर्व आबडे करी व मुस्लिम बांधव माझ्यासोबत आहेत. काही दिवसांआधी दर्यापूरला माठे ी सभा झाली होती. त्यावेळी दोन्ही समाजातील नागरिक सभले ा उपस्थित होते.

आपल्याला जनतेचा प्रतिसाद लाभत असून वंचित सुद्धा आम्हाला पाठिंबा दिला. वं चितचे काही पदाधिकारी विरोधात गेल्यामुळे त्यांना पक्षातून काढून टाकले मात्र निष्ठावान कार्यकर्ते आमच्यासोबत आहेत. तसेच एमआयएमसुध्दा मोठ्या ताकदीने सोबत असल्यामुळे काँग्रेसचा पराभव निश्चित आहे, असे आनंदराज आंबेडकर यांनी माध्यमांना सांगितले. यावेळी लोकसभा उमेदवार आनंदराज आंबेडकर यांच्यासह जिल्हाध्यक्ष अनिल बरडे, प्रा. सतीश सियाले, एमआयएमचे सनाउद्दीन खान, विनायक दुधे आदी उपस्थित होते.

## बळवंत वानखडे यांना रयत क्रांती संघटनेचा पाठिंबा

अमरावती : महाविकास आघाडीचे उमेदवार बळवंत वानखडे यांना रयत क्रांती सघं टनने े पाठिंबा दिला असनू वानखड े यानं ा निवडून आणण्याकरिता संघटनेचे पदाधिकारी कामाला लागले आहेत.

कठोरा नाकास्थित थीम पार्क येथे २२ एप्रिलला झालेल्या बैठकीत काँग्रेस पक्षाचे लोकसभा उमेदवार आमदार बळवंत वानखडे यांना डॉ. सुनील देशमुख, माजी खासदार अनंत



गुढे, माजी महापौर मिलिंद चिमोटे, शिवसेनेचे पराग गुडदे आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत रयत क्रांती संघटनेची बैठक घेण्यात आली. यावेळी रयत क्रांती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नागरिकांच्या उपस्थितीत रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष सागर मैदानकर यांनी बळवंत वानखडे यांना पाठिंबा दिला.

यावेळी संघटनेचे विदर्भ प्रमुख अ‍ॅड. आशिष वानखडे, शहर प्रमुख डॉ. विजय खंडारे, महिला शहर प्रमुख सोनाली उंबरकर, जिल्हा समन्वयक अमिन गुडे, आवेझ खान, गौरव वऱ्हाडे, श्रीकांत गावंडे, समीर वरघट, अक्षय इंदूरकर उपस्थित होते.






**काय करूं आतां धरूनिया भीड । नि:शंक हे तोंड वाजविले ।।
नव्हे जगीं कोणी । मुकीयांचा जाण सार्थक लाजून नव्हे हित ।।**

कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी तिला वर्तमानपत्राची आवश्यकता असते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्ष्याप्रमाणे होते. – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## उमेदवाराच्या चारित्र्यापासून संपत्तीपर्यंत

*सामान्यतः सार्वजनिक जीवनातील व्यक्तीबाबत सामान्य जनतेचीदेखील हीच अपेक्षा असते. राजकारणातील कोणाही व्यक्तीकडून गैरव्यवहार होऊ नयेत व विशेषतः सत्तेवरील राजकारण्यांकडून तर तसे अजिबातच होऊ नयेत, अशी अपेक्षा गैर नाहीच; म्हणूनच राजकारणातील व्यक्तींवर भ्रष्टाचाराचा कलंक असेल किंवा त्याच्या वर्तन वा व्यवहाराभोवती संशयाचे भोवरे असतील तर स्वतःस निर्दोष सिद्ध करून स्वच्छ चारित्र्यानिशी जनतेसमोर येणे ही त्या व्यक्तीची जबाबदारीदेखील असते. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीतील अखेरच्या काळात स्वतःवरील कमकुवतपणाच्या आरोपांबाबत खेद व्यक्त करताना हेच उद्गार काढले होते. आपल्या कारकिर्दीचे मूल्यमापन माध्यमांपेक्षा इतिहासच अधिक निःपक्षपातीपणे करेल आणि इतिहासाकडूनच मला न्याय मिळेल असेही ते तेव्हा म्हणाले होते. राजकारणी नेत्यांमध्ये पारदर्शक प्रामाणिकपणा बहुधा अभावानेच आढळतो. राजकीय व्यवहारांत निष्कलंक चारित्र्य आणि पारदर्शक वर्तन यांची जनतेकडून असलेली अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आपण केला, असे त्यांचे मत होते. अशी व्यक्तिमत्वे राजकारणासारख्या क्षेत्राला दिशादर्शक ठरतात, कारण याच क्षेत्रात अशा अपेक्षा पूर्ण करणाऱ्यांचा अभाव असतो. तसे नसते, तर निवडणुकांच्या काळात उमेदवारांकडून शपथपूर्वक दाखल केल्या गेलेल्या प्रतिज्ञापत्रांतील संपत्ती, गुन्हेगारीचे आरोप अथवा खटले आदी तपशिलाबाबत प्रश्नचिन्हे उमटली नसती. आजकाल जगात जवळपास सगळीकडेच निवडणुकांच्या रिंगणातील अनेक उमेदवार किंवा राजकीय नेते कोणत्या ना कोणत्या गुन्हेगारी किंवा अन्य स्वरूपाच्या खटल्यांस तोंड देत असून अनेक नेते भ्रष्टाचारासारख्या गंभीर आरोपांमुळे संशयाच्या फेऱ्यात सापडलेले आहेत. भारतात तर गेल्या काही वर्षांत राजकीय नेत्यांवरील प्रलंबित खटले वेगाने निकाली काढण्यासाठी कार्यवाही करणे हा न्यायव्यवस्थेचा काळजीचा मुद्दा होऊन राहिल्याने व वर्षागणिक अशा खटल्यांमध्ये भरच पडत गेल्याने, राजकारणातील पारदर्शकतेपुढे संशयाचे पडदे गडद होत गेले होते. राजकारणातील भ्रष्टाचाराविरोधात तीव्र लढा पुकारण्याची आणि भ्रष्टाचारी राजकारण्यांस वठणीवर आणण्याची अनेक आश्वासने सगळीकडेच दिली जात असतात. त्यामुळे भ्रष्टाचाराचा मुद्दा राजकारणात कायमच सार्वत्रिकपणे केंद्रस्थानी असल्याने, ज्युलियस सीझरने पत्नीच्या वर्तनाबाबत व्यक्त केलेली अपेक्षा आणि राजकीय क्षेत्रातील व्यक्तींकडून व्यक्त होणाऱ्या अपेक्षा कालातीत ठरल्या आहेत. एखाद्या उमेदवाराचे राजकीय वजन आणि सामाजिक प्रतिष्ठा मोजताना केवळ कोणत्याही मार्गाने निवडून येण्याची त्याची क्षमता हाच निकष प्रभावी ठरू लागला, तेव्हापासून कदाचित अशा अपेक्षांकडे गांभीर्याने पाहण्याची वृत्ती कमी होत गेली असावी. त्यामुळेच निवडणुकांअगोदर ज्याप्रमाणे उमेदवाराच्या प्रतिज्ञापत्रांतील संपत्ती, मालमत्ता आणि गुन्हेगारी स्वरूपाच्या खटल्यांचा तपशील पाहण्यात जनतेस रस असतो, तशीच उत्सुकता अशा उमेदवारांपैकी कोण किती मताधिक्याने निवडून येतो हे पाहण्यातही असते. खरे तर हा काहीसा विरोधाभास झाला. कारण, उमेदवाराच्या चारित्र्यापासून संपत्तीपर्यंतचा सारा तपशील त्याने शपथपूर्वक जनतेच्या माहितीसाठी खुला केलेला असतानाही, आपल्या प्रतिनिधीस निवडून देताना मतदारांनी या तपशिलाचा गांभीर्याने विचार करून निर्णय घ्यावा अशी अपेक्षा असते. तरीही निवडून आलेल्या उमेदवारांपैकी कोणत्या लोकप्रतिनिधीच्या शिरावर कोणत्या खटल्यांची टांगती तलवार आहे, याचीही चर्चा व्हावी हे सीझरच्या पत्नीकडून असलेल्या अपेक्षेशी काहीसे विसंगत ठरते. कदाचित म्हणूनच लोकप्रतिनिधी म्हणून निवडणुकांच्या रिंगणात उतरणाऱ्या व्यक्तींवरील खटल्यांची प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढून त्यांना त्यांच्या वास्तव रूपात जनतेसमोर जाणे शक्य व्हावे, यासाठी न्याय व्यवस्थाच अधिक दक्ष झालेली दिसते. असे प्रलंबित खटले किमान कालावधीत निकाली काढावेत, अशा सूचना न्यायालयांनी याआधी अनेकदा दिल्या आहेत. देशातील आजी-माजी खासदारांवर असलेल्या फौजदारी खटल्यांच्या सुनावणीसाठी जलदगती न्यायालयांच्या धर्तीवर विशेष न्यायालये स्थापन करण्याच्या सूचना सुमारे सात वर्षांपूर्वी, २०१६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिल्या होत्या. त्यावर कार्यवाही करण्याचे त्या वेळी केंद्र सरकारने मान्यदेखील केले होते. अशा न्यायालयांची स्थापना झाली किंवा नाही, यावर पुढे फारशी चर्चा झालीच नाही.*

# स्त्री जाणीवेचा हुंकार असलेला कवितासंग्रह ह्न माझ्या शब्दांच्या गर्भात

मानवाची उत्पत्ती ही आईच्या गर्भातून होत असते. ही एक नैसर्गिक निर्मिती आहे. ही निर्मिती घडून येण्यासाठी स्त्रीला आपल्या गर्भात नऊ महिने हाडामासाचा गोळा सांभाळावा लागतो. त्यानंतर अपत्य जन्माला येत असते. या प्रक्रियेत स्त्रीचा पुनर्जन्म होत असतो. मानव जन्माला त्यामुळे अनन्यसाधारण महत्व आहे.

साहित्य क्षेत्रातही अशीच प्रक्रिया पहावयास मिळते. कोणतीही साहित्यकृती निर्मिती करावयाची असल्यास त्या साहित्याला आधी साहित्यिकाने आपल्या मनाच्या गर्भात रुजवावे लागते. समाजमनाच्या वातावरणात पोषक असे विचारांचे खत पाणी घालून त्या साहित्याला तावूनसुलाखून घ्यावे लागते. त्यांनतर ती साहित्यकृती निर्मिती होत असते. कोणत्याही साहित्यिकाला आपली पहिली निर्मिती ही परमोच्च आनंद देणारी असते. जसं घरात लग्नानंतर पहिले अपत्य जन्माला येते आणि त्याचा आनंद पूर्ण परिवाराला होतो तसेच साहित्य निर्मितीतील पहिली कलाकृती ही त्या साहित्यिकाचे पहिले अपत्य असते आणि त्यामुळेच त्याचा आंनद काही वेगळाच असतो. अशीच एक साहित्य कलाकृती नुकतीच वाचनात आली. आणि तिच्या निर्मितीच्या शोधात जावे लागले.




कवयित्री सौ. सविता दरेकर यांची माझ्या शब्दांच्या गर्भात ही काव्यसंग्रहाची पहिलीच निर्मिती आहे. या काव्यसंग्रहाचे खास वेगळे असे स्वतःचे स्थान आहे. कवयित्री नवोदित असल्याने त्यांनी आपल्या काव्यसंग्रहाला एक वेगळेपणा देण्याचा प्रयत्न केलेला आहे. माझ्या शब्दांच्या गर्भात या काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ हे या कलाकृतीचे खास आकर्षण आहे. ज्या प्रमाणे विश्वाची निर्मिती ही पृथ्वीच्या गर्भातून होते तशीच या काव्यसंग्रहाची निर्मिती शब्दांच्या गर्भातून झालेली दिसून येते. या मुखपृष्ठाची निर्मिती अतिशय कल्पकतेने केलेली आहे. आईच्या गर्भात जसे बाळ वाढत जाते तसे कवितेतील शब्द या विश्वाच्या गर्भातून जन्म घेत असल्याचे दाखवले आहे. आणि ते शब्द एक एक गर्भातून बाहेर येत आहेत. नवनिर्मिती घेत आहेत. आणि हे नवनिर्मितीसाठी बाहेर पडणारे शब्द चढाओढीने कागदावर येत आहे. जणू काही आईच्या गर्भातूनच हे शब्द मुलासारखे जन्म घेत आहेत असे दाखवले आहे. कविता किंवा साहित्य निर्मिती अशीच जन्म घेत असते. शब्दाशब्दातून जन्म घेणाऱ्या या कविता नवनिर्मितीचा परमोच्च आनंद देतात.

माझ्या शब्दांच्या गर्भात या काव्यसंग्रहात एकूण ८० कवितांचा समावेश केला आहे. विविध विषयाला गवसणी घालून कवयित्रीने आपल्या मनाला व्यस्त ठेवून शब्दांना भुरळ घातली आहे. शब्दांच्या गर्भात या शीर्षक कवितेने या काव्यसंग्रहाला सुरुवात करून कवयित्रीने मानवी मनाच्या स्त्री मनाच्या वेदनांना वाट करून दिली आहे. माणसाच्या मुखात गोडवा असावा, मनात राग लोभ नसावा, माणसाने माणसाला प्रेम द्यावे. पण माणसे तसे करत नाही . स्त्री वेदनांना समजून घेत नाही. स्त्रीने कितीही वेदना मांडल्या तरी त्या समजून घेत नाहीत. त्या फक्त कागदावरच राहतात अशी खंत त्यांनी आपल्या शब्दांच्या गर्भात या कवितेत व्यक्त केली आहे. त्या म्हणतात की–

***नको राग नको लोभ, मुखी पेरा शब्द धन.***
***प्रेम द्यावे प्रेम घ्यावे, माणसाला माणसानं.***
***स्त्रीमनाच्या वेदनांनी, व्यथा कितीही मांडल्या.***
***शब्दांच्याच गर्भातूनी, कथा कागदी सांडल्या.***

कवयित्री या समाजात वावरणाऱ्या आहेत. लहानपणापासून आईवडिलांच्या छत्रछायेखाली असल्याने सामाजिक सलोखा, रीतीरिवाज, सण समारंभाबद्दल त्यांना गोडी आहे. समाजात विविध सण उत्सव साजरे केले जातात त्यासणांचे महत्व कवयित्री सहज सांगतात. या सणातून प्रेमाचे , एकोप्याचे संदेश त्यांनी समाजाला दिले आहे. रक्षाबंधन या कवितेत त्यां म्हणतात ह्न आयुष्यात जन्मभर, धागा गुंफतो बंधन. झाले मतभेद तरी, जोडते रक्षाबंधन. बहिण भावाच्या मतभेदाला सहज जोडायचे काम रक्षाबंधनाचा धागा करतो ही समजूतदारपणाची दृष्टी या ठिकाणी दिसून येते तर दिवाळी या कवितेत मायबाप गणगोत, सारे भेटतात जेव्हा. घरोघरी दीपोत्सव , मनी प्रकाशतो तेव्हा. आई बाप हे सर्व सुखाचे आगार आहे. आणि बाप घरात नसतील तर घर स्मशानासारखे वाटते आणि ते घरी असतील तर घरात चैतन्य येते, मन प्रकाशमान होते.

कवयित्री शेतकरी कुटुंबातील असल्याने त्यांना शेतीची आवड आहे.निसर्गावर त्यांचे प्रेम आहे.निसर्गातील झाडे, वेली, शेती, पाखरे यांविषयी त्यांना आस्था आहे. निसर्गात त्यांचे मन रमून जाते. म्हणून त्या निसर्ग या कवितेत म्हणतात की ह्न निसर्गात रमलेले, मन माझे झाले वेडे. स्वप्नातील प्रीतफुले, कुणा कसे सांगू गडे. या निसर्गाने वेड लावले आहे. ते कुणाला सांगू असा प्रश्न कवयित्रीला पडला आहे. तर प्राजक्त या कवितेत त्या म्हणतात ह्न वेड लावती जीवाला, प्राजक्ताची ही फुले. शुभ्र केसरी रंगानी, प्रीत पाकळीही खुले. या निसर्गाची हिरवाई देखील कवयित्रीला साद घालत आहे. निसर्गातील फुले मनाला मोहित करतात. म्हणून त्या हिरवाई या कवितेत म्हणतात की– जाईजुई रातराणी, लाल गुलाबी फुले. मोह घालती मनाला, झेंडू निशिगंध डुले.

कवयित्री या देवावर श्रद्धा ठेवणाऱ्या आहेत. पांडुरंगाप्रती त्यांच्या मनात अपार श्रद्धा आहे. त्या इतरांविषयी परमेश्वराकडे नेहमी मागणे मागतात की, हे परमेश्वरा , सर्वांना सुखी राहू दे, सर्वांच्या देहात तुझाच वास आहे. तूच या देहात राहतो . परमेश्वराचे गुणगान गाऊन त्याच्या प्रती भाव प्रकट करतांना त्या येरे पांडुरंग या कवितेत म्हणतात की,

**किती सांगू तुझी, गोड गुण गाथा. निराधार जना, आहे तूच नाथा.**
**सुखी राहो सर्व, आहे मनी ध्यास. देहांत नांदतो, तुझाच रे वास.**

तर आईबापा विषयी प्रेम व्यक्त करताना पंढरीच्या पांडुरंगाला मायापित्याला पाहण्यासाठी जरा वेळ उभे राहण्याची विनंती कवयित्री करीत आहे. माझे मायबाप हे काशीच्या भगवंताच्या बरोबरीचे आहे. त्यांना पाहण्यासाठी उभा राहा अशी आर्त साद घालत आहे. म्हणून भक्त पुंडलीक या कवितेत त्या म्हणतात कि, जरा थांब विठ्ठला, विटेवरी उभा रहा. मायबाप माझ्यासाठी, आहे काशीचे रे पहा.

पंढरीच्या पांडुरंगाच्या भक्तीत तल्लीन होऊन जातात. हा भक्तीचा पूर पाहून मन प्रसन्न होते. म्हणून कवयित्री वारकरी या कवितेत म्हणतात की, पूर दिंडीत भक्तांचा, भजनात सारे दंग. वारी सोहळा प्रसन्न, नाम गजर चढे रंग.कवयित्री सौ. दरेकर या हळव्या आहेत, भावनाशील आहेत. समाजातील स्त्री विषयी त्यांच्या मनात आस्था आहे. सामाजिक जाणीव त्यांच्यात दिसून येते. स्त्रीमनाच्या वेदनांनी त्या व्यथित होतात. जीवनात स्त्रीवर्गाला होणारी छळणूक पाहून त्या हळव्या होतात. स्त्रीला दुःख हे जन्मासोबतच येते, आणि हा स्त्री जन्म म्हणजे तारेवरची कसरत आहे. हे कर्माचे भोग स्त्रीला छळतात. म्हणून त्या अंतरीच्या वेदना प्रकट करताना म्हणतात की,

***दुःख संघर्षाचे असे, जन्मा येती संगतीला.***
***कसरत तारेवरची, भोग छळती नारीला.***

या छळातून स्त्रीने मुक्तता करून घेतली पाहिजे. स्त्रीने परंपरेतून आलेल्या वर्चस्वाला झुगारून लढा दिला पाहिजे. पुढे येणाऱ्या पिढीला ज्ञानी केले पाहिजे. म्हणून कवयित्रीचे मन गुलामी झुगारून देवू पाहत आहे. म्हणून त्या म्हणतात की, तोड गुलामीच्या बेड्या, मोड अज्ञानाच्या रूढी. घालू नको खतपाणी, आता घडो ज्ञानी पिढी. अन्यायाला वाचा फोड, न्यायासाठी दारे खोल. सळसळ वाहे रक्त, नाती जगी झाली फोल.

या कवितासंग्रहातील कुणब्याची लेकरे, हरवलेला झोका, मुखवटा, माहेर, अजूनही मी तरुणच, मनी काहूर दाटले, स्वार्थ, परकी, प्रतिकार, उंबरठा, प्रहार या कविता वाचतांना वेगळीच अनुभूती येते. कवितेच्या प्रांतात कवयित्री नवीनच असल्याने नवखेपणाच्या पाऊलखुणा दिसून येतात. लहान बाळाचे पावले जसे अडखळत पडतात तसे शब्द अडखळत कागदावर पावलांचे ठसे उमटवत जातात . आजचे हे अडखळणे म्हणजे उद्याची भरधाव वेगाने जाणारी एखादी धावपटू होईल यात तिळमात्र शंका नाही. या संग्रहातील सर्वच कविता वाचकाला विचार करायला लावणाऱ्या आहेत.

समाजातील स्त्री वेदना, निसर्ग संवर्धन, आई वडिलांविषयी असलेली आत्मीयता, देवावरची श्रद्धा, मानवसंवर्धन, अशा विविध पैलूंनी हा काव्यसंग्रह नटला आहे. या काव्यसंग्रहाच्या मलपृष्ठावर कवयित्री सौ. दरेकर यांनी आपलं आयुष्याकडे बघण्याचे दोन शब्द मांडले आहे. हे सामाजिक जीवनात वावरणाऱ्या तमाम मानव वर्गाला एक वेगळा संदेश देतात. त्या म्हणतात की, आयुष्यात स्वप्न तर सारेच बघतात, पण ते पूर्ण करायला किती जण धावतात. अनेक माणसं बालपणीच स्वप्न पाहतात. काही स्वप्न पूर्ण होतात, तर काही अर्ध्यातच वाट सोडून देतात. त्यामुळे मनातली खंत आणि डोळयातले भाव क्षितीज आपली वाट पाहत आहे म्हणून खुणावत असतात. मग जेव्हा शब्दांच्या गर्भात घेऊन जातात ती अर्धवट स्वप्न. शब्दांच्या जोरावर निराशा सोडून चांगलं करण्याची उमेद बाळगून सुंदर जीवन जगणे हेच तर माणूसपणाच लक्षण आहे. त्यासाठी चाल पुढे तू चाल आणि चालत रहा शेवटपर्यंत न थांबता.

माझ्या शब्दांच्या गर्भात या पहिल्याच काव्यसंग्रहासाठी नाशिकच्या प्रसिद्ध लेखिका तथा कवयित्री सौ. स्वाती पाचपांडे यांनी प्रस्तावना देवून स्वागत केले आहे. या संग्रहाचे आणखी एक वैशिष्ट म्हणजे इथं शब्दांना सत्याचा स्पर्श होतो या ब्रीदवाक्याने आज महाराष्ट्रातील अनेक लेखक कवींच्या नवनिर्मितीवर मोहोर पडली जाते त्या मा. सुरेश पवार यांच्या गिरणादूत प्रकाशन, नाशिक या प्रकाशन संस्थेने ही कलाकृती वाचकांच्या स्वाधीन केली आहे.

या काव्यसंग्रहाच्या सौंदर्यात भर टाकण्याचे काम प्रशिध्द मुखपृष्ठकार विशाल देशमुख यांनी केले आहे अत्यंत कल्पकतेने या मुखपृष्टावर भाव उतरविले आहे. या संग्रहातील शब्दांना मूर्त रूप देण्याचे महत्त कार्य एम.एस. ग्राफिक्स यांनी केले तर हिऱ्यांना पैलू पाडून कोंदणात बसवावे तसे कुलश्री प्रिंटर्स यांनी शब्दांना पैलू पाडून या कलाकृतीत बसवले आहे.

***सौ. दरेकर यांना पुढील दर्जेदार लिखाणासाठी शुभेच्छा देतो.***

–परिक्षण–
**प्रशांत एस. वाघ**
**संपर्क :**
**७७७३९२५०००**



# हिंदुत्वाचा गळा घोटणाऱ्यांना माफी नाही

## मुख्यमंत्री शिंदेंचा उध्दव ठाकरेंवर हल्लाबोल : खा. नवनित राणांच्या प्रचारार्थ सायंस्कोरवर सभा

अमरावती : अमित शहा यांची भेट घेतल्यावर आम्हाला प्रेरणा मिळते. ३७० कलम हटवून त्यांनी जम्मू-काश्मीरला स्वतंत्र बनवले. बाळासाहेब ठाकरेंचे स्वप्न पूर्ण केले. एवढंच नाही ते एखाद्याला मदतीचा हात देतात तेव्हा ते त्याच्यासाठी काहीही करायला तयार असतात. त्यांची अनुभूती मला देखील आहे. अमित भाई कोणालाही बंददाराआड शब्द देत नाहीत, ते उघडपणे बोलतात. पण सत्तेसाठी बाळासाहेबांचे विचार सोडणारे, हिंदुत्वाचा गळा घोटणाजयांना अमित भाई कधीही माफ करत नाहीत, त्यांना सोडत देखील नाहीत, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, मुंबईत






काही दिवसांपूर्वी ओमर अब्दुला आले होते त्यांनी सांगितले की, श्रीनगरमध्ये आम्ही महाराष्ट्र सदन होऊ देणार नाही. मग आम्ही देखील पाहू त्या ठिकाणी महाराष्ट्र सदन कसे होत नाही. आमच्यासोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आहेत. जम्मू काश्मीरमध्ये महाराष्ट्र सदन होणारच, अशी ग्वाही शिंदे यांनी दिली. शिंदे म्हणाले की, पुन्हा एकदा मोदी सरकार बनवण्याचा निर्धार देशातील लोकांनी केला आहे. मोदींच्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी अमित शहा यांच्याकडून प्रयत्न केले जात आहे. देशाची अर्थव्यवस्था मोदीजींनी बाराव्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकावर आणली. तर येत्या काळात तिसरूया स्थानावर देशाची अर्थव्यवस्था आणणार आहेत. तर दुसरीकडे विदेशात जाऊन देशाची बदनामी करणारे राहुल गांधी कुठे आणि संपूर्ण विश्वात स्वत:चा व भारताचा डंका वाजवणारे मोदीजी कुठे? असे म्हणत शिंदे यांनी गांधींवर हल्लाबोल केला. शिंदे म्हणाले की, महाराष्ट्रात असे सरकार होते की, नवनीत राणा व रवी राणा यांना हनुमान चालिसा म्हणण्यास देखील परवानगी देत नव्हते. त्यांना १४ वर्षे जेलमध्ये टाकले गेले. यावर मंचावर असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अमरावतीच्या लोकसभेच्या उमेदवार नवनीत राणा देखील हसायला लागले. तेव्हा उपमुख्यमंत्री फडणवीसांनी पाठिमागून सांगताच व शिंदेंना त्यांची चूक लक्षात आली. त्यांनी १४ दिवस राणा दाम्पत्यांनी जेलवारी भोगली असे म्हटले. तर हमारी बहन १४ साल तक भी जेलमध्ये राहिली असती, असे म्हणत त्यांनी वेळ मारून नेली

## मतदारांची ओवाळणी आणि पुष्पगुच्छाने स्वागत!

अमरावती : येत्या शुक्रवारी लोकसभेच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी आणि मतदारांना आकर्षित करण्यासाठी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या मार्गदर्शनात शुक्रवारी (ता.२६ एप्रिल) पहिल्या पंधरा मिनिटात मतदानाला येणाऱ्या गावागावातील मतदारांना पुष्पगुच्छ देऊन आणि ओवाळणी करून त्यांचे स्वागत करण्यात येणार असल्याचे स्वीपचे जिल्हा नोडल अधिकारी डॉ. कैलास घोडके यांनी सांगितले. अमरावती जिल्ह्यातील मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी आजपर्यंत स्वीपच्या माध्यमातून वेगवेगळे उपक्रम जसे मानवी साखळी, तिरंगा महा रॅली, सावली बैठका, गाव फेरी, द पिंक फोर्स ग्रुप यासारखे उपक्रम राबवून मतदारांना आकर्षित करण्यात येत आहे. तर शहरी भागातील मतदारांसाठी रसपान भी और मतदान भी, गल्लीगल्लीत रॅली, इत्यादी उपक्रम स्वीप च्या माध्यमातून राबविण्यात येत आहेत. गावपातळीवर अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, ए एन एम, शिक्षिका बचत गटांच्या महिला यांचा द पिंक फोर्स नावाचा ग्रुप स्थापन करण्यात आला असून हा ग्रुप प्रत्येक दिवशी घरोघरी भेटी देऊन मतदारांना जागृत करण्यासाठी मोठ्या प्रमाणात काम करत आहे.

# ज्वेलर्समधून उडविला २.५२ लाखांच्या दागिण्यांच्या बॉक्स

अमरावती : अज्ञात बुरखाधारी महिलेने भरदिवसा सराफा बाजारातील एका ज्वेलर्समधून २ लाख ५२ हजार रूपये किमतीचा सोन्याच्या दागिण्यांचा बॉक्स उडविल्याने चांगलीच खळबळ उडाली. खोलापुरीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाजया सराफा बाजारील प्रताप चौकात ही घटना घडली. याबाबत पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे अज्ञात महिले विरोधात गुन्हे दाखल केले आहे. तेजस सुरेशराव गुहे (२५) रा.कुंभारवाडा असे तक्रारकर्त्यांचे नाव आहे. माहितीनुसार तेजस यांचे सराफा बाजारातील प्रताप चौकात ज्वेलर्सचे दुकान आहे. तेजस हे त्यांचे वडील सुरेशराव यांच्यासोबत दुकान सांभाळतात.

२३ एप्रिलला सकाळी ११ वाजताच्या सुमारास गुहे पिता-पुत्राने दुकान उघडल्यानंतर तासाभरानंतर तेजस काही कामानिमित्त कामानिमित्त बाहेर गेल्यानंतर सुरेशराव गुहे दुकानात एकटेत होते. त्या वेळात दुकानात अनेक ग्राहक आले आणि गेले. अशातच सुरेशराव यांना दुकानातील रॅकमधून दागिण्यांचा एका बॉक्स गायब दिसला. संपूर्ण दुकानात शोध घेऊनही बॉक्स न सापडल्याने अखेर सुरेशराव यांनी तेजसला फोन करून दुकानात बोलविले. तेजसने दुकानात येऊन सीसीटीव्ही फुटेज तपासले असता सुरेशराव दुकानाच्या वरच्या मजल्यावर कामानिमित्त गेले असता काळया रंगाचा बुरखा घातलेल्या एका अज्ञात महिलेने दुकानात येऊन तो लाल रंगाचा प्रुस्टाचा दागिण्यांचा बॉक्स मोठया शिताफीने लंपास केल्याचे दिसले. बॉक्समध्ये ३ ग्रॅमचे ८ नग सोन्याचे टॉप, ३.५ ग्रॅमचे ४ नग टॉप, २ ग्रॅमच्या २ अंगठया असे एकूण २ लाख ५२ हजार रूपयांचे दागिने होते. ही घटना उघड होताच सराफा बाजारात एकच खळबळ उडाली. माहिती मिळताच खोलापुरीगेट पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठून पंचनामा केला. याबाबत पोलिसांनी फुटेजच्या आधारे अज्ञात महिलेविरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# जिल्हाबाहेर कर्तव्यावर कर्मचाऱ्यांचे आज मतदान संपणार, बॅलेट पेपरव्दारे प्रक्रिया

अमरावती - निवडणुक कर्तव्यावर असलेल्या जिल्हा बाहेरील अधिकारी, कर्मचारूयांचे मतदान बॅलेट पेपरव्दारे मंगळवार पासुन जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू करण्यात आले आहे. गुरुवार २५ एप्रिल पर्यंत तीन दिवस ही प्रक्रिया चालणार आहे.याकरीता निवडणूक विभागा कडून कर्मचाजयांची देखील नियुक्ती देखील करण्यात आली.याशिवाय जिल्ह्यातील कर्तव्यावर असलेल्या कर्मचारूयांकरीता ईव्हीएममध्येच मतदानची सुविधा करण्यात आली आहे. जिल्ह्यात ११ हजार ८७६ कर्मचाऱ्यांची ड्युटी निवडणुक प्रक्रियेत लावण्यात आली



आहे. यातील काही कर्मचाऱ्यांची ड्युटी जिल्ह्यात असलेल्या परंतु वर्धा मतदान संघात समावेश असलेल्या पाच तालुक्यात लागली आहे.या सर्व कर्मचाजयांचे विधानसभा निहाय १५ व १६ एप्रिल रोजी प्रशिक्षण पार पडले. प्रशिक्षण स्थळी जिल्हाबाहेरील मतदार असलेल्या अधिकारी, कर्मचारूयांना बॅलेट पेपरवर मतदानाची सुविधा करण्यात आली होती. याशिवाय जे अधिकारी, कर्मचारी जिल्हाबाहेरील आहे अशा कर्मचारूयांचे देखील मतदान बॅलेट पेपरव्दारे सुरू करण्यात आले आहे.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन कार्यालयात सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजतापर्यत मतदान प्रक्रिया सुरू होती.ही प्रक्रिया सलग तीन दिवस २५ एप्रिलला दुपार पर्यंत राहणार आहे. याशिवाय सहा विधानसभा मतदार संघात् संघात कार्यरत जिल्ह्यातील अधिकारी , कर्मचारूयांना मात्र २६ एप्रिल रोजीच ईडीसी अर्थात इक्लेशन ड्युटी सर्टीफीकेट अंतर्गत ईव्हिएम मध्ये मतदान करण्याची सुविधा देण्यात आली आहे.अशा सर्व कर्मचारूयांची नोंद निवडणुक विभागाव्दारे करण्यात आली असुन ज्या मतदान केद्रावर अधिकारी, कर्मचारी यांची ड्युटी लागली आहे, त्याच मतदान केद्रावरील ईव्हिएमवर त्यांना मतदान करता येणार आहे.

## शाहरुखची हिरोईन क्लासी लूकमध्ये



दाक्षिणात्य लेडी सुपरस्टार नयनतारा वयाची पन्नाशी गाठायला आलीय. सध्या ती ४९ वर्षांची असून तिचे ब्लॅक ड्रेसमधील सुपर हॉट फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. आपल्या सुंदर पर्सनॅलिटीमुळे तिने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. सध्या सोशल मीडियावर तिचे फोटो खूप व्हायरल झाले आहे. तिचा हा व्हिडिओ मुंबईमध्ये झालेल्या एका अॅवॉर्ड शोचा आहे.याठिकाणी तिने खूप सुंदर आऊटफिटमध्ये हजेरी लावली. तिने परिधान केलेल्या ड्रेसमध्ये खूप बोल्ड दिसत होती. तिची अदाकारी घायाळ करणारी होती. फोटोमध्ये नयनतारा लॉन्ग ब्लॅक गाऊनमध्ये दिसली, जी खूप डीप नेकलाईन होती. बॉडी-हगिंग गाऊनमुळे तिचा हॉट लूक दिसत आहे. मोकळ्या केसात तिचा क्लासी लूक दिसत आहे. तिने आपला लूक ब्लॅक हाय हिल सोबत कम्प्लिट केला आहे. तिचे ग्लॅम मेकअप खूप शानदार दिसत आहे.

# सद्धम्म बुद्धविहाराच्या वतीने संयुक्त जयंती उत्सव

अमरावती : स्थानिक सद्धम्म बुद्ध विहार मार्डी रोड यांचे वतीने महात्मा ज्योतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला डॉ. किशोर राऊत मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. ध्येय तसेच उद्दिष्टे साध्य करताना संस्काराची जोड असणे आवश्यक आहे. व्यक्तिभाव, भक्तीभाव यास तिलांजली देऊन संविधानभाव जोपासल्यास हीच खरी महामानवाला मौलिक आदरांजली ठरेल



असे प्रतिपादन डॉ. राऊत यांनी केले. अध्यक्षस्थानी डॉ सुरेंद्र मांडवधरे होते. त्यांनीही मौलिक विचार व्यक्त करून महात्मा फुले व बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस अभिवादन केले. प्रास्ताविकातून पा. ना. दंदे यांनी विहाराच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती दिली. अक्षंत पराग टोकसे, वैष्णवी खंडार, प्रशिका महिंदकर, अनुष्का वासनिक, रचित्र गडलिंग, विहान डेरे, यश कळंबे, गार्गी महिंदकर, निलय पाचोडे, यश मोहोड, मनस्वी दहाट, स्वराज भंकाडे, निहा इंगळे, प्रणाली मोहोड, अनुष्का गाडगे, संज्योत गावंडे, यश धांडे इत्यादी बालकांनी लघु व्याख्यानात सहभाग घेऊन उपस्थितांची मने जिंकली.

# पंतप्रधानांच्या वादग्रस्त भाषणाची चौकशी सुरू

### निवडणूक आयोगाकडे काँग्रेसने केली होती तक्रार



नवी दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बांसवाडा येथे दिलेल्या वक्तव्याची निवडणूक आयोगाने चौकशी सुरू केली आहे. काँग्रेस सत्तेत आल्यास लोकांच्या मालमत्तेचे मुस्लिमांमध्ये वाटप करेल, असे पीएम मोदी राजस्थानमधील बांसवाडा येथे म्हणाले होते. पंतप्रधानांनी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या टिप्पणीचाही उल्लेख केला होता, ज्यात त्यांनी म्हटले होते की, देशाच्या संसाधनांवर अल्पसंख्याकांचा पहिला हक्क आहे.

पंतप्रधानांच्या या विधानाविरोधात काँग्रेस आणि माकपने निवडणूक आयोगाकडे स्वतंत्र तक्रारी केल्या होत्या. संपत्तीच्या वितरणाबाबत पंतप्रधान मोदींच्या विधानावर कारवाई करावी, अशी विनंती काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे केली होती. काँग्रेसने या विधानाचे वर्णन फूट पाडणारे, दुर्भावनापूर्ण आणि विशिष्ट समुदायाला लक्ष्य करणारे असे केले होते. सीपीआय(एम)चे सरचिटणीस सीताराम येचुरी यांनीही एका पोस्टमध्ये निवडणूक आयोगाला या तक्रारीकडे लक्ष देऊन पंतप्रधान मोदी आणि भाजपवर कारवाई करण्याचे आवाहन केले होते. याप्रकरणी एफआयआर नोंदवण्याची मागणीही त्यांनी केली होती. राजस्थानमधील बांसवाडा येथे पीएम मोदी म्हणाले होते, काँग्रेसचे सरकार आल्यास प्रत्येकाच्या मालमत्तेचे सर्वेक्षण केले जाईल. आमच्या बहिणींकडे किती सोने आहे याचा तपास करतील. चांदीचा हिशेब घेतला जाईल.

# लोकसभा निवडणुकीचे अचूक भविष्य सांगा, २१ लाख मिळवा

### अंनिसने राजकीय भविष्य सांगणाऱ्या ज्योतिषांना दिले आव्हान

नवी दिल्ली: लोकसभा निवडणुकीचा प्रचाराचा ज्वर वाढला आहे. सर्वच पक्षाचं या प्रचार सभा होते आहे. रोड शोमुळे शहरे गजबजली आहेत. राजकीय पक्षांकडून कोणाला किती जागा मिळणार? याचा दावा केला जात आहे. त्याचवेळी काही व्यक्ती कोण पंतप्रधान होणार, सत्तेत कोणता पक्ष येणार, कोणत्या पक्षाला किती जागा मिळणार? असे भविष्य वर्तवत आहेत. राजकीय भविष्य सांगणाऱ्या ज्योतिषांना अंधश्रद्धा निर्मूलन समितीने (अंनिस) आव्हान दिले आहे. अचूक भविष्य सांगणाऱ्यांना २१ लाखांचे बक्षीस अंनिसने जाहीर केले आहे. राजकीय विश्लेषक सोडून, जे



ज्योतिष्यशास्त्र म्हणून राजकीय भविष्य सांगतात त्यांना हे खुलं आव्हान देण्यात आल्याचे अंनिसचे मिलिंद देशमुख यांनी म्हटले आहे. सध्या देशभरात लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी चालू आहे. अनेक राजकीय नेते देखील या फसवणुकीला बळी पडतात. त्यामुळे अज्ञानी आणि भोळ्या भाबडया लोकांमध्ये गैरसमज निर्माण होतात. त्यांच्यात अंधश्रध्दा निर्माण होते. या पोर्शभूमीवर महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समितीने देशातील सर्वच ज्योतिषांना आव्हान दिले आहे. लोकसभा निवडणूक निकालाचे अचूक भविष्य वर्तवून एकवीस लाख रुपये बक्षीस जिंकण्याचे आव्हान दिले आहे अशी माहिती अनिसने दिली आहे.

अंनिसने आव्हान स्वीकारण्यासाठी एक प्रक्रिया तयार केली आहे. त्यासाठी प्रश्नावली देखील तयार केली आहे. ही प्रश्नावली आव्हान स्वीकारणाऱ्यांना भरुन द्यावी लागणार आहे.

त्यांचा हा अंदाज अचूक ठरल्यास त्यांना २१ लाख रुपये देण्यात येणार आहे. आव्हान राजकीय अंदाज वर्तवणाऱ्या राजकीय अभ्यासकांना नाही तर ज्योतिष्यशास्त्राचा आधार घेऊन राजकीय भविष्य सांगणाऱ्या ज्योतिषांसाठी आहे, असे अंनिसने म्हटले आहे.अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडून दरवेळी भविष्य वर्तवण्यास बक्षीस जाहीर केले जाते. परंतु अद्याप काणेही हे आव्हान स्वीकारुन सिद्ध केले नाही. यामुळे यंदाही कोणी ही आव्हान स्वीकारणार का? हा प्रश्न आहे,

# महाराष्ट्रातील ८, देशातील ८९ जागांसाठी उद्या मतदान

मुंबई (वृ.सं.), दि. २४ : लोकसभेच्या दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रातील ८ मतदारसंघांसह देशातील ८९ जागांसाठी शुक्रवारी मतदान होणार आहे. त्यासाठी सध्या जोरजोराने धडाडणाऱ्या प्रचाराच्या तोफा बुधवारी सायंकाळी थंडावल्या. शेवटच्या दिवशी अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्व पक्षीय उमेदवारांनी विविध माध्यमातून शक्तीप्रदर्शन करण्यावर भर दिला. राज्यातील बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणीत २६ एप्रिलला मतदान होत आहे. त्यानिमित्त शेवटच्या दिवशी राज्यात अनेक नेत्यांच्या प्रचारसभा झाल्या. गृहमंत्री अमित शाह यांची अमरावतीत, तर काँग्रेस नेते राहुल गांधी यांची परतवाडा व सोलापूरमध्ये सभा झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्धवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आदी नेत्यांनी देखील जाहीर सभा गाजविल्या. प्रचार तोफा थंडावल्या असल्यातरी मिळालेल्या वेळेत उमेदवार आपली रणनीती आखून जास्तीतजास्त मतदारांना मतदान केंद्रापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करणार आहेत.

# नवविवाहित दाम्पत्याची आत्महत्या

नांदेड : अवघ्या दोन महिन्यांपूर्वी विवाह झालेल्या दाम्पत्याने शेतातील आखाड्यावरील लोखंडी अँगलला गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली. ही घटना नांदेड जिल्ह्यातील कळकावाडी ता.कंधार येथे मंगळवारी (दि.२३) रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. नामदेव उद्धव केंद्रे (वय २१) व कोमल नामदेव केंद्रे (वय १९) असे मृत दाम्पत्याचे नाव आहे. या नवदाम्पत्याच्या आत्महत्येमागील कारण अद्याप समजू शकले नाही.

# प्रहार उमेदवार दिनेश बुब यांच्या पदयात्रेत हजारोंची गर्दी

अमरावती : लोकसभा निवडणुकीच्या दुसजया टप्प्यातील प्रचाराच्या शेवटच्या दिवशी प्रहार जनशक्तीचे उमेदवार दिनेश बुब यांच्या प्रचारासाठी काढण्यात आलेल्या पदयात्रेत स्वयंस्फूर्तीने हजारो प्रहार कार्यकर्ते तसेच नागरीत सहभागी झाले होते. रॅलीपूर्वीच शहरातून तसेच अचलपूर, परतवाडा, मेळघाट, तिवसा, दर्यापूर येथून प्रहारचे कार्यकर्ते येण्यास सुरुवात झाली होती. जिल्हा स्टेडियमवर कार्यकर्त्यांची गर्दी झाल्याने खचाखच भरले होते. रॅलीत सामील होण्यासाठी प्रथम दिनेश बुब नंतर प्रहारचे संस्थापक बच्चू कडू यांच्यासह मेळघाटचे प्रहारचे आमदार राजकुमार पटेल रॅलीत पोहोचले. विशेष म्हणजे या रॅलीत उमेदवार दिनेश बुब यांच्या पत्नी शीतल बुब आणि प्रहारचे आमदार बच्चू कडू यांच्या पत्नी नयना कडू यांचीही सहभाग होता. दुपारी एक वाजता जिल्हा स्टेडियमपासून रॅलीचा शुभारंभ





झाला. या पदयात्रेत प्रहारचे उमेदवार दिनेश बुब, प्रहार जनशक्तीचे संस्थापक तथा आमदार बच्चू कडू, मेळघाटचे आमदार राजकुमार पटेल हे खुल्या जीपमध्ये स्वार होते. जिल्हा स्टेडियमपासून निघालेली रॅली इर्विन चौक, मालवीय चौक, जयस्तंभ चौक, गांधी चौक, राजकमल चौक मार्गे नेहरू मैदानावर पोहोचली.या रॅलीत २० हजारांहून अधिक पदाधिकारी, कार्यकर्ते, समर्थक आणि नागरिक तसेच दिव्यांग सुद्धा मोठ्या उत्साहात स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले होते. पदयात्रेत कार्यकर्त्यांमध्ये उत्साह भरण्यासाठी बच्चू कडू यांनी जीपमधून खाली उतरून कार्यकर्त्यांसोबत चालण्यास सुरुवात केली. ते जीपमधून खाली उतराताच लोकांमध्ये आणखी जोश भरला आणि जोरदार घोषणाबाजी सुरू केली. त्यामुळे काही वेळाने बच्चू कडू पुन्हा जीपमध्ये जाऊन उभे राहिले. रॅलीत सहभागी होण्यासाठी महिलाही मोठ्या संख्येने जिल्हा स्टेडियमवर पोहोचल्या. यामध्ये मुस्लिम महिलांचाही समावेश होता. या रॅलीत महिलांनी हातात प्रहारचे झेंडे घेतले होते आणि सर्वांच्या मुखी 'हमारा भिडू बच्चू कडू' असा एकच नारा होता. काही महिला आपल्या मुलांसह रॅलीत पोहोचल्या होत्या. रॅलीत सहभागी होण्यासाठी आलेल्या प्रहारच्या कार्यकर्त्यांनी रॅली सुरू होण्यापूर्वीच डीजेवर नाचण्यास सुरुवात केली. या काळात कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. त्यानंतरही जिल्हा स्टेडियम ते नेहरू मैदानापर्यंत कार्यकर्ते डीजेवर नाचत राहिले. जिल्हा स्टेडियमपासून सुरू झालेल्या या पदयात्रेत प्रहारचे कार्यकर्ते सर्वत्र शिट्ट्या वाजवत राहिले. प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या हातात प्रहारचा झेंडा हातात घेतला होता. पदयात्रेत सहभागी असलेले कार्यकर्ते ईव्हीएमवर ९ क्रमांक म्हणजेच दिनेश बुब यांचा क्रमांक दाखवत सर्वत्र शिट्ट्या वाजवत मतदान करण्याचे आवाहन करत होते.

या मोर्चात अनेक दिव्यांगी सहभागी झाले होते. हे लोक आपापल्या वाहनाने पदयात्रेसोबत जात होते. त्यांच्या हातात प्रहारच्या उमेदवाराचे निवडणूक चिन्ह असलेली एक शिट्टीही होती.त्यांनी जोरजोरात शिट्टी वाजवत लोकांनी दिनेश बूब यांना मतदान करण्याचे आवाहन केले. विशेष म्हणजे सर्व दिव्यांगांनी आपल्या वाहनांवर प्रहारचे झेंडे लावले होते. पदयात्रेत काही तरुण पोस्टर घेऊन फिरताना दिसले. या पोस्टर्सवर बच्चू कडू यांचे चित्र आणि निवडणूक घोषणा लिहिण्यात आल्या होत्या. याशिवाय काही लोकांनी हातात दिनेश बुब यांचे चित्र असलेले होर्डिंग्जही लावले होते. पदयात्रेत प्रहारचे कार्यकर्ते दिनेश बुब, बच्चू कडू आणि राजकुमार पटेल यांच्यासोबत सेल्फी घेण्यासाठी मोठे उत्साहित झाले होते.


आमची अमरावती, आमची दुग्धपुर्णा

अमरावती शहरातील हे पहिले सरकारी बांधकाम! या चौकातील, त्याच्या बाजूला असलेले उपविभागीय कार्यालय म्हणजे तहसील आणि एसडीओ ऑफिस १८६८ साली बांधले गेले. त्याला त्या काळात स्मॉल पोस्ट म्हणत त्याचा बांधकाम खर्च आहे फक्त ५४१८३ रुपये. त्या इमारतीला लागूनच तहसील कार्यालय १८७७ मध्ये बांधण्यात आले. त्यावर खर्च करण्यात आले ३४४४७ रुपये. (आज एवढ्या रकमेमध्ये साधी बाथरूम देखील बांधता येऊ शकत नाही.) या दोन्ही इमारती आजही अतिशय उत्तम स्थितीमध्ये आणि व्यवस्थित कार्यरत आहेत.

मे.दुग्धपूर्णा शितालय

राजकमल चौक, अमरावती. फोन : २५६२६६२










गौरव प्रकाशन वृत्तपत्र मालक, प्रकाशक, संपादक - बंडूकुमार श्रीरामजी धवणे यांनी मुद्रक गौरव बं. धवणे यांच्या अनुश्री ग्राफीक्स, चपराशीपुरा अमरावती येथे मुद्रीत करून गजानन नगर नं. १, नवीन बायपास रोड, अमरावती अमरावती-६,येथे प्रकाशित केले. मो. ९९६०२२५२७५ या पत्रातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (कोणताही वाद अमरावती न्याय कक्षेत) Email: gauravprakashan1@gmail.com., Website : www.gauravprakashan.com (HARD COPY-B/W, PDF-COLOUR)